# 16. बीजगणिताची पूर्वतयारी

**विदुला** : सर, दादा म्हणत होता, की तो बीजगणिताचा अभ्यास करतोय. बीजगणित म्हणजे काय हो ?

**सर** : तुमच्यापुरतं सांगायचं झालं, तर बीजगणित म्हणजे संख्या आणि अक्षरं यांचा वापर करून मांडलेलं गणित.

**रवी** : म्हणजे अक्षरांमधे बेरीज-वजाबाकी अशा क्रिया करायच्या ? त्या कशा करायच्या ?

**सर** : ते शिकण्यासाठी पूर्वतयारी म्हणून संख्यांच्या मदतीनं काही गोष्टी शिकूया.

## ❒ समानता

दोन संख्यांवर बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार यांपैकी कोणतीही क्रिया केली, की आलेलं उत्तर म्हणजे एक संख्याच असते. जसं, 5 आणि 3 यांची बेरीज केली, की 8 ही संख्या मिळते. हेच आपण थोडक्यात '$5 + 3 = 8$' असं लिहितो. तसंच $13 - 6 = 7$, $12 \div 4 = 3$, $9 \times 1 = 9$.

आता आपण उलट विचार करू.

दोन संख्यांत क्रिया करून 12 ही संख्या मिळेल. अशा संख्यांच्या जोड्या मिळवू. जसं, $(6 + 6)$, $(15 - 3)$, $(6 \times 2)$, $(24 \div 2)$ इत्यादी.

जेव्हा आपल्याला 'सहा आणि सहा यांची बेरीज करून येणारी संख्या' असं म्हणायचे असतं, तेव्हा ते $(6 + 6)$ असे कंस वापरून दाखवणे सोईचं होतं.

जसे, $(15 - 3)$ म्हणजे 'पंधरातून तीन वजा करून येणारी संख्या'.

$(6 \times 2)$ म्हणजे 'सहाला दोननं गुणून येणारी संख्या'.

$(24 \div 2)$ म्हणजे 'चोवीसला दोननं भागून येणारी संख्या'.

$(6 + 6)$, $(15 - 3)$, $(6 \times 2)$, $(24 \div 2)$ अशा प्रत्येक मांडणीला पदावली असं म्हणतात. या प्रत्येक पदावलीची किंमत 12, म्हणजे समान आहे. या सर्व पदावली एकमेकींशी समान आहेत.

हेच आपण $(6 + 6) = (15 - 3)$, $(6 + 6) = (24 \div 2)$, $(6 \times 2) = (15 - 3)$ असं लिहू शकतो.

$(6 + 6) = (15 - 3)$ , $(6 + 6) = (24 \div 2)$ अशा स्वरूपाच्या मांडण्यांना **समानता** म्हणतात.

$5 + 3 = 8$ , $9 \times 1 = 9$ याही समानता आहेत.

### उदाहरणसंग्रह 54

1. बेरीज 13 येईल अशा संख्यांच्या तीन जोड्या, कंसांचा उपयोग करून लिहा. त्यावरून तीन वेगवेगळ्या समानता लिहा.
2. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार यांपैकी प्रत्येक क्रिया करून 18 ही संख्या मिळेल, अशा संख्यांच्या चार जोड्या लिहा. त्यांवरून चार वेगवेगळ्या समानता लिहा.

## ❒ असमानता

$7 + 5$ आणि $7 \times 5$ या पदावलींच्या किमती अनुक्रमे 12 आणि 35 आहेत, म्हणजे त्या समान नाहीत. 'समान नाहीत' हे सांगण्यासाठी '$\neq$' हे चिन्ह वापरतात.

$(7 + 5)$ आणि $(7 \times 5)$ या पदावली समान नाहीत, हे थोडक्यात $(7 + 5) \neq (7 \times 5)$ असे लिहितात. अशा मांडणीला **असमानता** म्हणतात.

$(9 - 5) \neq (15 \div 3)$ याचा अर्थ $(9 - 5)$ आणि $(15 \div 3)$ या पदावलींच्या किमती समान नाहीत.

दोन पदावलींच्या किमती समान नाहीत, म्हणजेच दोन पदावलींच्या किमती लहान-मोठ्या आहेत. लहान-मोठेपणा सांगण्यासाठी आपण '$<$ ' आणि '$>$ ' ही चिन्हे वापरतो, म्हणून ही चिन्हे वापरूनही असमानता लिहिता येते.

$(9 - 5)$ ची किंमत 4 आणि $(15 \div 3)$ ची किंमत 5 आहे. $4 < 5$ म्हणून $(9 - 5)$ आणि $(15 \div 3)$ या पदावलींतील संबंध $(9 - 5) < (15 \div 3)$ असा किंवा $(15 \div 3) > (9 - 5)$ असा लिहिता येतो.

✦ पदावलींच्या जोड्यांमधील चौकटींत $<$ , $=$ , $>$ यांपैकी योग्य चिन्ह लिहा.

(1) $(9 + 8)\ \boxed{\phantom{0}}\ (30 \div 2)$

$9 + 8 = 17, \quad 30 \div 2 = 15$

$17 > 15$

म्हणून $(9 + 8)\ \boxed{>}\ (30 \div 2)$

(2) $(16 \times 3)\ \boxed{\phantom{0}}\ (4 \times 12)$

$16 \times 3 = 48, \quad 4 \times 12 = 48, \quad 48 = 48$

म्हणून $(16 \times 3)\ \boxed{=}\ (4 \times 12)$

(3) $(16 - 5)\ \boxed{\phantom{0}}\ (2 \times 7)$

$16 - 5 = 11, \quad 2 \times 7 = 14,$

$11 < 14$

म्हणून $(16 - 5)\ \boxed{<}\ (2 \times 7)$

✦ पदावलींच्या जोड्यांमधील चौकटींत अशी संख्या लिहा, की त्यामुळे होणारे विधान बरोबर असेल.

(1) $(7 \times 2) = (\ \boxed{\phantom{0}} - 6)$

$7 \times 2$ या पदावलीची किंमत 14 आहे, म्हणून चौकटीत अशी संख्या हवी, की ज्या संख्येतून 6 वजा केल्यावर वजाबाकी 14 येईल. 20 मधून 6 वजा केल्यावर वजाबाकी 14 येते.

म्हणून $(7 \times 2) = (\ \boxed{20} - 6\ )$

(2) $(24 \div 3) < (5 + \boxed{\phantom{0}}\ )$

$24 \div 3$ या पदावलीची किंमत 8 आहे, म्हणजे चौकटीत अशी संख्या हवी, की ती 5 मध्ये मिळवल्यावर बेरीज 8 पेक्षा जास्त असेल.

आता $5 + 1 = 6, \quad 5 + 2 = 7, \quad 5 + 3 = 8,$ म्हणून चौकटीतील संख्या 3 पेक्षा मोठी हवी, म्हणजे चौकटीत 4, 5, 6, ..., अशी कोणतीही संख्या लिहिली तरी चालेल. याचा अर्थ या प्रश्नाची उत्तरे अनेक आहेत. $(24 \div 3) < (5 + \boxed{4}\ )$ हे अनेक उत्तरांपैकी एक आहे. असे असले तरी अशा प्रश्नाचे एकच उत्तर लिहिणे पुरेसे असते.

## उदाहरणसंग्रह 55

**1.** चूक की बरोबर हे सांगा.

(1) $(23 + 4) = (4 + 23)$ (2) $(9 + 4) > 12$ (3) $(9 + 4) < 12$ (4) $138 > 138$

(5) 138 < 138 (6) 138 = 138 (7) (4 × 7) = 30 – 2 (8) $\frac{25}{5} > 5$

(9) (5 × 8) = (8 × 5) (10) (16 + 0) = 0 (11) (16 + 0) = 16 (12) (9 + 4) = 12

**2.** पदावलींच्या जोड्यांतील चौकटींत = , < , > यांपैकी योग्य चिन्ह लिहा.

(1) (45 ÷ 9) ☐ (9 – 4) (2) (6 + 1) ☐ (3 × 2) (3) (12 × 2) ☐ (25 + 10)

**3.** दिलेली विधाने बरोबर होण्यासाठी पदावल्यांमधील चौकटींत योग्य संख्या लिहा.

(1) (1 × 7) = (☐ × 1) (2) (5 × 4) > (7 × ☐) (3) (48 ÷ 3) < (☐ × 5)

(4) (0 + 1) > (5 × ☐) (5) (35 ÷ 7) = (☐ + ☐) (6) (6 – ☐) < (2 + 3)

### ❒ अक्षरांचा उपयोग

गणित विषयाच्या लेखनात चिन्हांचा वापर खूपच केला जातो. चिन्हांचा वापर केल्यामुळे लेखन अतिशय थोडक्यात करता येते. जसे, 'पंचाहत्तर या संख्येला पंधरा या संख्येने भागल्यावर भागाकार पाच येतो.' हेच वाक्य, चिन्हे वापरून, '75 ÷ 15 = 5' असे थोडक्यात करता येते. ते समजण्यासही सोपे आहे.

**चिन्हांप्रमाणेच अक्षरांचा वापर करूनही लेखन सोपे, सुटसुटीत करता येते.**

संख्यांवर बेरीज, वजाबाकी वगैरे क्रिया करताना, क्रियांचे अनेक गुणधर्म तुमच्या लक्षात आले असतील. जसे, (4 + 9) , (9 + 4) अशा बेरजांमधून कोणता गुणधर्म लक्षात आला ?

कोणत्याही दोन संख्यांची बेरीज आणि त्याच दोन संख्यांचा क्रम बदलून येणारी बेरीज समानच असते.

आता हा गुणधर्म अक्षरांचा उपयोग करून लिहिला, तर कसा सोपा, आटोपशीर होतो पाहा.

- कोणत्याही दोन संख्यांसाठी आपण $a$ आणि $b$ ही अक्षरे वापरू. त्यांची बेरीज '$a + b$' अशी येईल. त्याच संख्यांचा क्रम बदलून बेरीज '$b + a$' ही येईल. म्हणजे नियम असा होईल –

  $a$ आणि $b$ या कोणत्याही दोन संख्या असतील, तर $(a + b) = (b + a)$.

  आणखी दोन उदाहरणे पाहा.
- कोणत्याही संख्येला 1 या संख्येने गुणले असता गुणाकार त्या संख्येएवढाच येतो. थोडक्यात, $a \times 1 = a$.
- दोन वेगवेगळ्या संख्यांचा भागाकार आणि त्या संख्यांचा क्रम बदलून केलेला भागाकार हे समान नसतात. थोडक्यात, $a$ आणि $b$ या वेगवेगळ्या संख्या असतील, तर $(a \div b) \neq (b \div a)$.

  $a$ ची किंमत 8 आणि $b$ ची किंमत 4 घेऊन हा गुणधर्म तुम्ही पडताळून पाहा.

## उदाहरणसंग्रह 56

**1.** 'कोणतीही संख्या' यासाठी अक्षर वापरून पुढील गुणधर्म थोडक्यात लिहा.

(1) कोणत्याही संख्येत शून्य ही संख्या मिळवून येणारी बेरीज त्या संख्येएवढीच असते.

(2) कोणत्याही दोन संख्यांचा गुणाकार आणि त्या संख्यांचा क्रम बदलून केलेला गुणाकार हे समान असतात.

(3) कोणतीही संख्या आणि शून्य यांचा गुणाकार शून्य असतो.

**2.** अक्षर वापरून लिहिलेले गुणधर्म शब्दांत लिहा.

(1) $m - 0 = m$ (2) $n \div 1 = n$

✦✦✦

# पारिभाषिक शब्द सूची

| | गणितीशब्द | इंग्रजीप्रतिशब्द | उच्चार |
|---|---|---|---|
| 1 | अपूर्णांक | Fraction | फ्रॅक्शन् |
| 2 | अर्धा | Half | हाफ् |
| 3 | असमानता | Inequality | इनइकवॉलिटि |
| 4 | अंक | Digit | डिजिट् |
| 5 | अंतर्भाग | Interior | इंटीरियर् |
| 6 | अंश | Numerator | न्यूमरेटर् |
| 7 | आकृतिबंध | Pattern | पॅटर्न् |
| 8 | आयत | Rectangle | रेक्टँगल् |
| 9 | आलेख | Graph | ग्राफ् |
| 10 | आलेखकागद | Graph-paper | ग्राफ् पेपर् |
| 11 | आंतरराष्ट्रीय अंक | International digit | इंटरनॅशनल् डिजिट् |
| 12 | एकक | Unit | युनिट् |
| 13 | एककस्थान | Unit's place | युनिट्स प्लेस् |
| 14 | काटकोन | Right angle | राइट् अँगल् |
| 15 | केंद्र | Centre | सेंटर् |
| 16 | कोटी (संख्या) | Crore | क्रोऽर |
| 17 | कोन | Angle | अँगल् |
| 18 | कोनमापक | Protractor | प्रोट्रॅक्टर् |
| 19 | कंस (वर्तुळ) | Arc | आर्क् |
| 20 | क्रमसंबंध | Order relation | ऑर्डर् रिलेशन् |
| 21 | क्रिया | Operation | ऑपरेशन् |
| 22 | क्षेत्रफळ | Area | एरिया |
| 23 | गुणाकार (क्रिया) | Multiplication | मल्टिप्लिकेशन् |
| 24 | गुणाकार | Product | प्रॉडक्ट् |
| 25 | घटक | Components | काँपोनंटस् |
| 26 | घडण | Net | नेट् |
| 27 | घनफळ | Volume | व्हॉल्यूम् |
| 28 | चित्रालेख | Pictograph | पिक्टोग्राफ् |
| 29 | चोवीस ताशी कालमापन | 24 Hour clock | ट्वेंटि फोर् अवर् क्लॉक् |

# पारिभाषिक शब्द सूची

| | गणितीशब्द | इंग्रजीप्रतिशब्द | उच्चार |
|---|---|---|---|
| 30 | चौरस | Square | स्क्वेअर् |
| 31 | चौरस संख्या | Square number | स्क्वेअर् नंबर् |
| 32 | जीवा | Chord | कॉऽर्ड् |
| 33 | छेद | Denominator | डिनॉमिनेटर् |
| 34 | तासकाटा | Hour hand | अवर् हॅन्ड् |
| 35 | त्रिकोणी संख्या | Triangular number | ट्रायअँग्युलर् नंबर् |
| 36 | त्रिज्या | Radius | रेडियस् |
| 37 | त्रिमितीय | Three dimensional | थ्री डायमेन्शनल् |
| 38 | दशमान संख्यालेखन पद्धत | Decimal system of writing numbers | डेसिमल् सिस्टिम् ऑव्ह राइटिंग् नंबर्स् |
| 39 | दशकस्थान | Ten's place | टेन्स् प्लेस् |
| 40 | दशलक्ष | Ten lakh (lac) | टेन् लाख् (लॅक्) |
| 41 | दशांश | Decimal | डेसिमल् |
| 42 | दशांश अपूर्णांक | Decimal fraction | डेसिमल् फ्रॅक्शन् |
| 43 | दशांश चिन्ह | Decimal point | डेसिमल् पॉइंट् |
| 44 | देवनागरी संख्याचिन्ह | Devanagari numeral | देवनागरी न्यूमरल् |
| 45 | द्विमितीय | Two dimensional | टू डायमेन्शनल् |
| 46 | धारकता | Capacity | कपॅसिटि |
| 47 | पट | Multiple | मल्टिपल् |
| 48 | परिमिती | Perimeter | पेरिमीटर् |
| 49 | परीघ | Circumference | सर्कफरन्स् |
| 50 | पाऊण | Three quarters | थ्री क्वार्टर्स् |
| 51 | पाच चौरसांची घडण | Pentomino | पेन्टोमिनो |
| 52 | पाव | Quarter | क्वार्टर् |
| 53 | पृष्ठ | Face | फेस् |
| 54 | पृष्ठभाग | Surface | सरफेस् |
| 55 | फासा | Die | डाय् |
| 56 | फासे | Dice | डाइस् |
| 57 | बाकी | Remainder | रिमेऽन्डर् |

# पारिभाषिक शब्द सूची

| | गणितीशब्द | इंग्रजीप्रतिशब्द | उच्चार |
|---|---|---|---|
| 58 | बाजू | Side | साइड् |
| 59 | बाह्यभाग | Exterior | एक्स्टीरियर् |
| 60 | बारा ताशी कालमापन | Twelve hour clock | ट्वेल्व्ह अवर् क्लॉक् |
| 61 | बीजगणित | Algebra | ॲल्जिब्रा |
| 62 | बेरीज (क्रिया) | Addition | ॲडिशन् |
| 63 | बेरीज | Sum | सम् |
| 64 | भागाकार (क्रिया) | Division | डिव्हिजन् |
| 65 | भागाकार | Quotient | क्वोऽशंट् |
| 66 | भाजक | Divisor | डिव्हायझर् |
| 67 | भाज्य | Dividend | डिव्हिडंड् |
| 68 | भिन्नछेद अपूर्णांक | Unlike fractions | अनलाइक् फ्रॅक्शन्स् |
| 69 | भुजा | Side | साइड् |
| 70 | मध्यान्ह (माध्यान्ह) | Mid-day | मिड् डेऽ |
| 71 | मध्यान्होत्तर | Post meridian (p.m.) | पोस्ट् मेरिडियन् (पी. एम.) |
| 72 | मध्यान्हपूर्व | Ante meridian (a.m.) | अँटि मेरिडियन् (ए.एम.) |
| 73 | मापन | Measurement | मेझरमेंट् |
| 74 | माहिती (सांख्यिक) | Data | डाटा/डेटा |
| 75 | मिती | Measure | मेझर् |
| 76 | मिनिट | Minute | मिनिट् |
| 77 | मिनिट काटा | Minute hand | मिनिट् हॅण्ड् |
| 78 | मूळ संख्या | Prime number | प्राइम् नंबर् |
| 79 | रीत | Method | मेथड् |
| 80 | रेषा | Line | लाइन् |
| 81 | लक्ष | Lakh (lac) | लाख् (लॅक्) |
| 82 | लघुकोन | Acute angle | अक्यूट् अँगल् |
| 83 | लंब | Perpendicular | पर्पेंडिक्युलर् |
| 84 | लाख | Lakh (lac) | लाख् (लॅक्) |
| 85 | लांबी | Length | लेंऽग्थ् |
| 86 | वजाबाकी (क्रिया) | Subtraction | सबट्रॅक्शन् |

# पारिभाषिक शब्द सूची

| | गणितीशब्द | इंग्रजीप्रतिशब्द | उच्चार |
|---|---|---|---|
| 87 | वजाबाकी | Remainder | रिमेंऽडर् |
| 88 | वर्तुळ | Circle | सर्कल् |
| 89 | वर्तुळकंस | Arc of a circle | आर्क् ऑव्ह् अ सर्कल् |
| 90 | वस्तुमान | Mass | मॅस् |
| 91 | विभाजक | Divisor | डिव्हायझर् |
| 92 | विभाज्य | Dividend | डिव्हिडंड् |
| 93 | विभाज्यता | Divisibility | डिव्हिजिबिलिटि |
| 94 | विशालकोन | Obtuse angle | अबट्यूस ॲंगल् |
| 95 | विस्तारित रूप | Expanded form | एक्सपांडेड् फॉर्म् |
| 96 | व्याज | Interest | इंटरेस्ट् |
| 97 | शतकस्थान | Hundred's place | हंड्रेड्स् प्लेस् |
| 98 | शतांश | Hundredth | हंड्रेड्थ् |
| 99 | समच्छेद अपूर्णांक | Like fractions | लाइक् फ्रॅक्शन्स् |
| 100 | सममूल्य अपूर्णांक | Equivalent fractions | इक्विव्हॅलंट् फ्रॅक्शन्स् |
| 101 | समानता | Equality | इक्वॉऽलिटि |
| 102 | समांतर | Parallel | पॅरॅलल् |
| 103 | सहमूळ संख्या | Co-prime numbers | को प्राइम् नंबर्स् |
| 104 | सेकंद | Second | सेकंड् |
| 105 | संख्या | Number | नंबर् |
| 106 | संख्याचिन्ह | Numeral | न्यूमरल् |
| 107 | संयुक्त संख्या | Composite number | कॉम्पोझिट् नंबर् |
| 108 | स्थान | Place | प्लेस् |
| 109 | स्थानिक किंमत | Place value | प्लेस् व्हॅल्यू |
| 110 | सांख्यिक माहिती | Numerical data | न्यूमरिकल् डाटा/डेऽटा |
| 111 | हजार | Thousand | थाउजंड् |

# इयत्ता ५ वी, ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शिका



- मराठी, इंग्रजी, उर्दू, हिंदी माध्यमामध्ये उपलब्ध
- सरावासाठी विविध प्रश्न प्रकारांचा समावेश
- घटकनिहाय प्रश्नांचा समावेश
- नमुन्यादाखल उदाहरणांचे स्पष्टीकरण

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे–४११००४.

₹३६.००